# 'छत्रपती शिवाजी महाराजांचा राजनीतिविषयक दृष्टिकोन'

**सहा. प्रा. राजाराम हरी पाटील** पद्मभूषण डॉ. क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी कला महाविद्यालय, झरे. ता. आटपाडी, जि. सांगली. मोबा.9767495011 Mail id: rajaramhpatil2012@gmail.com

---

**प्रस्तावना :-**

प्राचीन, मध्ययुगीन कालखंडाचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, प्राचीन कालखंडापासून भारत भूमीवर अनेक राजे ,महाराजे, सम्राट व चक्रवर्ती होऊन गेले. सम्राट अशोक, अकबर या शासकांप्रमाणेच छत्रपती शिवाजी महाराज यांचे एक वैशिष्ट्यपूर्ण असे शासन होते. शिवाजी महाराज आदर्श शासन पद्धतीने जगविख्यात झाले. प्राचीन कालखंडातील कौटिल्याच्या अर्थशास्त्र ग्रंथातील सप्तांग सिद्धांतामध्ये राजाची कर्तव्ये स्पष्ट केली आहेत. या ग्रंथांचा आधार शासककर्तेनी घेतलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य व महती यांचे वर्णन इतिहासाच्या पानोपानी सूवर्ण अक्षरानी लिहिले. प्रचलित इस्लाम राजवट व तत्कालीन सद्य:स्थिती व छत्रपती शिवाजी महाराजांचे ध्येय उद्दिष्ट यांचा विचार केला असता, त्यांचे राज्य एक वैशिष्ट्यपूर्ण व लोककल्याणकारी राज्य होते .हे स्पष्ट होते. एत्देशीय राज्यकर्ते व इस्लाम राजवटीशी संघर्ष करून आदर्श राज्य स्थापन करण्याचे ध्येय बाळगले व अनेक संकटांचा सामना करून सत्यात उतरवले हे जागतिक इतिहासातील एक महत्त्वपूर्ण उदाहरण आहे. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात मराठी सत्ता उदयास आली. व युगप्रवर्तक शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. म्हणूनच शिवाजी राजांनी न्याय समता, स्वातंत्र्य, बंधुता या मूल्यांवर आधारलेले राज्य निर्माण केले. त्यांची अर्थनीती, लष्कर व्यवस्था, धर्मनीती, आरमारी धोरण, प्रभावी युद्धतंत्र, राजनीती या धोरणांचा अवलंब अधिक कौशल्याने केला.[1]

म्हणूनच सदर संशोधनातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजनीती विषयक दृष्टिकोनाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**प्रशासनरचना-अष्टप्रधान मंडळ :-**

शिवकालीन प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास केला असता असे लक्षात की, शिवकालीन मुलकी प्रशासन व्यवस्थेमध्ये केंद्रीय प्रशासन व प्रांतिक प्रशासन असे दोन प्रकार होत. केंद्रीय प्रशासनात 'छत्रपती' हे सर्वोच्च राज्यपद होते. कारभार यंत्रणेच्या केंद्रस्थानी छत्रपतींचे स्थान होते. राज्य प्रशासन योग्य पद्धतीने चालावे, संरक्षण व राज्य संवर्धन करण्याच्या हेतूने अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली. अष्टप्रधान मंडळातील योजनेचे अवलोकन केले असता त्यांच्या दूरदृष्टीची कल्पना अनेक घटना व प्रसंगावरून लक्ष्यात येते. औरंगजेबासारख्या प्रचंड शक्तीशी संघर्ष करून यशस्वी ठरले. राज्याचे सद्य:स्थितीतील मंत्रिमंडळ, खाते विभागणी यांचे अवलोकन केले असता, छत्रपती शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ त्यांची कार्यपद्धतीत साम्य जाणवते. अंतर्गत लहान मोठी खाती, अठरा कारखाने, बारा महाल सरसुभे, सुभे यांच्यापासून अगदी खेड्यांपर्यंत अधिकाऱ्यांची नियुक्ती केली.[5] नियुक्ती करताना त्यांची कार्यक्षमता व राज्यनिष्ठेला महत्त्व दिले. पेशवा हा मुख्य प्रधान, सेनापती, अमात्य -मुलकी प्रधान, सुमंत, सचिव , पंडितराव, न्यायाधीश अशी अष्टप्रधान मंडळाची रचना मुख्य प्रधानास दरवर्षी 15000 होन पगार दिला जात असे. आमत्यास 12000 होन, व इतर मंत्र्यास 10000 होन पगार होता. असे वर्णन चिटणीस बकरी मध्ये दिले आहे.

स्वराज्याच्या प्रशासनासाठी स्वराज्याची चार विभागांमध्ये विभागणी केली होती. त्या विभागात सरसुभा असे म्हटले जाते. त्यावरील अधिकारी सरसुभेदार असे. सरसुभ्याचा लहान विभाग म्हणजे सुभा होय. त्याचा अधिकारी सुभेदार सुभ्याचा उपविभाग म्हणजे परगणा-अधिकारी सरहवालदार असे. या परगणेचे विभाजन महाल-अधिकारी हवालदार. या प्रशासनातील शेवटचा घटक खेडे. बाजारपेठेच्या खेड्यांना ‘कसबे’ तर, लहान खेड्यांना ‘मौजे’ असे नाव होते. पाटील हा मौजे खेड्याचा कारभार पाहत, तर कुलकर्णी कसबा खेड्याचा. तसेच महाल, महाजन, दिवाण मुजूमदार, फडणवीस, सबनीस, कारखानीस, चिटणीस, पोतनीस, अधिकारी होते. कोणतीही अधिकारी पदे वंशपरंपरागत नव्हती. हे शिवकालीन प्रशासनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय.[4]

**आदर्श लष्करव्यवस्था :-**

शिवाजी राजांनी जहागिरी पद्धती ऐवजी नव्या लष्कर व्यवस्थेची उभारणी केली. परंपरागत शिक्षणाच्या आधारावर अवलंबून न राहता त्यांना नियमित प्रशिक्षण दिले जात असे. लष्करी व्यवस्थेचे प्रमुख पद छत्रपतींच्याकडे होते. त्यांच्या आज्ञेनुसारच युद्ध मोहिमा, लष्करी तह ,करारनामे इत्यादी निर्णय शिवाजी राजे सल्लामसलत करून घेत. शिवाजी राजांचा निर्णय अंतिम असे. लष्कराचे घोडदळ व पायदळ असे प्रकार होते. दहा पायदळ शिपायांवर एक नाईक, पन्नास शिपायांवर एक हवालदार, शंभर शिपायांवर एक जुमलेदार, शंभर शिपायांवर एक हजारी, व पाच हजार फौजेवर सरनोबत म्हणून मुख्य कामगार असे. पायदळातील शिपाई मावळ व हेटकरी या दोन जातींचे असत. मावळ हे घाटमाथ्यावर राहणारे व हेटकरी कोकणात राहणारे. बंदूक, ढाल, तलवार , बरची, तिरकमठा ही त्यांची हत्यारे होती. घोडेस्वारांची व्यवस्था पायदळाप्रमाणेच होती. पंचवीस स्वारांवर एक हवालदार, पाच हवाल्यांवर एक जुमलेदार, दहा जुमल्यांवर एक सुभेदार, दहा सुभ्यांवर पंचहजर असे. अंमलदार होते. दर पंचवीस घोड्यावर एक नालबंद व एक भिस्ती असत. प्रत्येक मराठा अंमलदाराच्या हाताखाली एक ब्राह्मण सबनीस व प्रभू कारखानी स अथवा ब्राह्मण मुजुमदार व प्रभू अधिकारी असत. घोडेस्वारात शिलेदार व बारगीर असे दोन वर्ग होते.[2]

स्वराज्याचे संरक्षण व्हावे आपल्या परिसरात असणाऱ्या शत्रू प्रदेशाची माहिति मिळावी यासाठी कार्यक्षम हेरखाते निर्माण केले. शत्रूच्या प्रदेशातून शिवाजी महाराजांच्या हेराचे जाळे पसरले होते. पूर्ण माहिती मिळवूनच शिवाजी राजे आपल्या मोहिमांचे आयोजन करत. अफजलखान वध ,शाहिस्तेखानाची स्वारी, आग्र्याहून सुटका अशा अनेक मोहिमात यश संपादन केले त्यात हेरखात्याचे प्रमुख योगदान होते. 'बहिर्जी नाईक' हे शिवाजी राजांच्या हेरखात्याचे प्रमुख होते. शिवाजी राजांनी गनिमी कावा या युद्धतंत्राचा प्रभावीपणे वापर करून हिंदवी स्वराज्याची स्थापना केल्याचे दिसून येते.[6]

**किल्ले प्रशासन व आरमारी धोरण :-**

प्राचीन कालखंडापासून मध्ययुगीन कालखंडामध्ये सुद्धा भारतीय व्यापाराचे आकर्षण व संपत्ती हस्तगत करण्याच्या उद्देशाने परकीय सत्तांचे भारतात आगमन झाले. यामध्ये पोर्तुगीज, डच, इंग्रज, फ्रेंच या परकीय सत्ता महत्त्वपूर्ण होत्या. यांनी सागराचे महत्त्व ओळखून त्यावर सत्ता स्थापन करून स्वतः प्रबळ बनण्याचे प्रयत्न केल्याचे दिसतात. परंतु तत्कालीन एत्देशीय राजांनी सागराकडे लक्ष दिल्याचे दिसत नाही.मात्र शिवरायांनी तत्कालीन वस्तुस्थिती जाणून दूरदर्शीपणाने सागराचे महत्व लक्षात घेऊन आदर्श आरमाराची उभारणी केली. इ .स 1660 - 62 च्या दरम्यान आरमारास सुरुवात केली. गुराबा, तरांडी, गलबते ,शिबाडे, तारू, तिरकारी पगार, पाल, मचवा होडी, पारव, जुग व फ्रिनेट अशा विविध जहाजांचा उल्लेख सभासद बखरीत आढळतो. तर आरमारात 640 लहान मोठ्या आकाराच्या होड्या, महाजीऱ्या, तारवे पालगुज अशी वर्गवारी चित्रगुप्ताच्या आरमार दलात दर्यासारंग व मायनाईक दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. पश्चिम किनाऱ्यावर जहाजांची दुरुस्ती व संरक्षणाच्या दृष्टीने विजयदुर्ग, सिंधूदुर्ग, कुलाबा या जलदुर्गाची बांधणी केली. 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग 'या आज्ञापत्रातील उल्लेखावरून दुर्गांचे महत्त्व लक्षात येते. शिवाजी राजांनी राज्यांच्या बंदोबस्तासाठी केलेली तजवीज व दूरदृष्टीची कल्पना त्यांच्या महाराष्ट्रभर कोकणात, समुद्रकाठी, घाटमाथ्यावरील किल्ल्यांवरून पहावयास मिळते. प्रतापगड रायगड सिंधुदुर्ग यांसारखे अनेक किल्ले नवीन बांधले. जुन्या किल्ल्यांची दुरुस्ती रामोशी, भिल्ल ,महार ,मांग या जमातींवर किल्ले व सभोवतालच्या प्रदेशाच्या रक्षणाची जबाबदारी सोपवली. हवालदार सबनीस व कारखानीस या अधिकाऱ्यांची किल्लारक्षणासाठी नियुक्ती केली.[3]

**न्यायव्यवस्था :-**

तत्कालीन न्यायव्यवस्था ही जुन्या हिंदू कायद्यांवर आधारलेली होती. त्या कालखंडात राजांची न्यायव्यवस्था ही परंपरागत हिंदू संस्कृतीस आणि समाजाला मान्य असणारी होती. या न्यायव्यवस्थेत शिवाजी महाराज सर्वोच्च न्यायाधीश होते. कोणताही निकाल देताना राज्याचा मुख्य न्यायाधीश, पंडितराव ,राज्यसभा गोतसभा, ब्रह्मसभा यांचा सल्ला घेऊनच न्यायदान होते. कोणत्याही प्रकरणाची चौकशी करूनच न्यायदान प्रक्रिया पार पडत असे. त्यांच्या इ. सन.1646 च्या मौजेराजे येथील पाटील, बाबाजी भिकाजी गुजर व कर्नाटक मोहिमेदरम्यान बेलवडीच्या सावित्रीबाई देसाई यांची गढी जिंकून घेण्यासाठी पाठविण्यात आलेल्या शेरखोजी गायकवाड यांच्या गैरवर्तन प्रकरणाचा न्याय पाहून त्यांच्या पारदर्शक न्याय व्यवस्थेची कल्पना येते. तसेच शिवकालीन केंद्रीय न्यायदानात राज्य मंडळ न्यायदान करत असे. व गोत सभा ही सर्वात कनिष्ठ असली तरी सभेला विशेष महत्त्वाचे स्थान दिसून येते.

**सर्वधर्मसहिष्णता – दाक्षिन्य :-**

शिवकालीन कालखंडात सरंजामशाहीच्या एकंदरीतच काळात स्त्रियांच्या अत्याचाराने परिसीमा गाठली होती. गरीब सामान्य रयतेचा लेकी सुना म्हणजेच राजेरजवाडे राजपुत्रांपासून ते सरदार ,वतनदार ,जमीनदार यांच्या दृष्टीने उपयोगाच्या वस्तू म्हणून पाहिले जात होते. स्त्रीवर अत्याचार व अन्याय झाला तर दाद मागता येत नव्हती. अशा परिस्थितीत शिवाजीराजांनी आपल्या सैनिकांना सूचना दिल्या होत्या, की लढाईत अथवा लुटीत हिंदू अथवा मुसलमान अशा कोणत्याही धर्माच्या स्त्रिया हाती आल्या तर त्यांना त्रास देता कामा नये. शिवाजी महाराज हे स्त्रियांना पूज्य मानणारे, परस्त्रीला मातेसमान मानणारे होते. हे कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेचा साडी चोळी अलंकार देऊन केलेला सन्मान व गोळेवाडीकरांची सून प्रकरण व माहूरची रायबागन या स्त्रियांच्या बद्दल शिवरायांची उदार विषयक धोरण, व स्त्रीदाक्षिण्याचा अनमोल विचार प्रस्थापित समाज व्यवस्थेच्या विरोधात असल्याचा दिसून येतो. शत्रूची स्त्री झाली म्हणून काय झाले . तिला सन्मानाने वागवले पाहिजे असे त्यांचे हुकूम होते.[7]

शिवाजी राजांच्या उदार व धार्मिक, सर्वधर्म, सहिष्णुतावादी धोरण त्यांच्या जीवनातील अनेक घटना व प्रसंगावरून दिसून येते. तत्कालीन समाजात धार्मिक विषमता व सामाजिक अत्याचाराचे प्रमाण भयंकर होते. अशा परिस्थितीत महानुभव व वारकरी संप्रदाय उदयास आले. संत तुकारामाचे विषमता, अज्ञान अंधश्रद्धा, कर्मकांडाविषयी अभंगाच्या माध्यमातून लोकजागृतीचे कार्य सुरू होते. त्यांच्याशी कोणी इथून व वैचारिक प्रभावातून शिवाजी महाराजांना मोलाचे मार्गदर्शन व दिशा मिळाली. तत्कालीन परिस्थितीत शिवाजी महाराजांचा लढा हा दुष्ट मुस्लिम राज्यांशी होता. मुस्लिम प्रजेशी नव्हता. सर्वजातीधर्मीय व्यक्तींना आपल्या स्वराज्यात सामावून घेतले. कुठल्याही मुस्लिम दर्ग्याला अथवा मज्जिदिला दिला त्यांनी हानी पोहोचवली नाही. त्यांचा संघर्ष धार्मिक स्वरूपाचा नव्हता. संत तुकाराम यांचे समकालीन असणारे, केळशीचे बाबा याकूत मुस्लिम संत हे छत्रपती शिवाजी महाराजांचे गुरु होते. त्यांच्या मदारीमुळे तर या मुस्लिम सेवकांनी जीवाची पर्वा न करता आग्रा भेटीवेळी आपले लावून दिले. त्यांचा विरोध मुस्लिम शासकांशी होता मुस्लिमांशी नाही. कुराणाची एखादी प्रत सापडली तर सन्मानपूर्वक मुस्लिम सैनिकास दिली जात असे. तत्कालीन उदाहरणांवरून त्यांच्या सर्वधर्म सहिष्णुतावादी धोरणाची कल्पना येते.[8]

**उत्तम प्रशासक :-**

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापनेचे स्वप्न, ध्येय उराशी बाळगले. ते सत्यात उतरवले.राज्याकरिता उत्तम प्रतीची प्रशासन व्यवस्था निर्माण केली. त्यांच्या उत्कृष्ट प्रशासन व्यवस्थेवरून, तत्कालीन कालखंडातील कार्यावरून उत्तम प्रशासक असल्याचे सिद्ध होते. जुन्या पारंपरिक सरंजामशाही पद्धतीचा विचार न स्वीकारता, वतनदारी नष्ट केली. राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. देशमुख, देशपांडे या वतनदारांचे अन्याय अत्याचाराच्या व भ्रष्टाचाराच्या प्रमाणात आळा घातला. जाती-पाती, धर्म, कुळे ,श्रेष्ठ - कनिष्ठ यांचा विचार न करता गुणवत्ता व कौशल्यास महत्त्व देऊन प्रशासनात नोकऱ्या दिल्या. राज्यकारभार व्यवस्थित चालावा म्हणून अष्टप्रधान मंडळाची निर्मिती केली. त्यांनी लष्कराप्रमाणे प्रशासनालाही महत्त्वाचे स्थान दिल्याचे वर्णन आज्ञापत्र तसेच सभासद बखर व इतर ऐतिहासिक साधनातून दिसून येते. हिंदवी स्वराज्य स्थापन करताना विजापूर ,मोगल, गोवळकोंडा, सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज या सत्तांशी संघर्ष करावा लागला . डोंगररांगा व डोंगरदऱ्यांच्या भागात गनिमी कावा हेच युद्धतंत्र महत्त्वपूर्ण व योग्य आहे हे, जाणून प्रभाविपणे अंमलबजावणी केली. त्यांच्या कार्यातून बुद्धिचातुर्य व दूरदृष्टीतील सिद्धता पहावयास मिळते.[6]

जावळीची मोहीम, अफजलखान वधाचा प्रसंग, शाहिस्तेखानावरील छापा, सुरतेवरील स्वारी, पुरंदरच्या तहाची घटना, आग्रा भेटीचा प्रसंगावेळी दाखवलेले राजकारणी कौशल्य, तत्परता, योग्य निर्णयक्षमता, मुत्सद्दीपणा इत्यादी गुणांचे दर्शन त्यांच्या व्यक्तिमत्वातून होते. त्यांचे धार्मिक धोरण हे निश्चितच उदारतेचे होते. सर्व जाती धर्मातील व्यक्तींना विकास व आपल्या क्षमता सिद्ध करण्याची संधी दिल्याचे दिसून येते. सर्व हिंदू वासियांना स्वाभिमानाची शिकवण देऊन स्वराज्य निर्मितीचे ध्येय साकार केले. शिवाजी महाराज चारित्र्यसंपन्न व उत्तम संघटक होते उच्च ध्येय बाळगून प्रामाणिकपणे संपूर्ण जीवन रयतेच्या कल्याणासाठी व्यतीत केले. म्हणूनच सर जदुनाथ सरकार यांनी 'हिंदू जातीतील महान रचनात्मक प्रतिभेचा पुरुष' अशी शिवाजी महाराजांची प्रशंसा करतात.[4]

**प्रजाहितरक्षण - अंतिम ध्येय :-**

तत्कालीन समाजात सामाजिक व धार्मिक विषमता हा आपल्या कार्यातील मोठा अडसर आहे. हे ओळखून त्यानुसार, आपल्या सैन्यात, मराठा, मुसलमान, ब्राह्मण, महार, मांग, रामोशी, बेरड, तेली, कोळी, धनगर विविध जातींना सामावून घेऊन समतेचा आदर्श निर्माण केला. राजा व रयत थेट संबंध प्रस्थापित केला. वतनदार, पाटील व कुलकर्णी यांच्या गैरवर्तनाला लगाम घालून प्रजेचा छळ होणार नाही, याची काळजी घेतली. अर्थव्यवस्थेचे नियोजन यशस्वीपणे केले. स्वराज्य हे रामराज्य प्रमाणेच व्यवस्थित करण्यासाठी यथाशक्ती प्रयत्न केले. लढाईमध्ये, मनुष्यहानी जनावरांची हत्या, घरादारांची पिकांची , नासधूस अशा बेचिराख व उजाड मुलखाचे पुनर्वसन केले. शेतकऱ्यांना संकटकाळी सारा माफी केली. शेतकरी हाच राज्याचा आधारस्तंभ मानून सर्व सोयी सुविधा केल्या. म्हणूनच त्यांच्या अनमोल व वैशिष्ट्यपूर्ण कार्यातून जनकल्याण व प्रजा निष्ठा ही ध्येय सफल झाल्याची दिसतात.[10]

**निष्कर्ष :-**

1) शिवाजी महाराजांच्या कार्याचे अवलोकन केले असता त्यांच्या अलौकिक युगप्रवर्तक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते.

2) एक उच्चतम सेनापती, लोककल्याणकारी राजा, कुशल प्रशासक श्रेष्ठ व मुत्सद्दीपना त्यांच्या कार्यातून दिसून येतो.

3) एक आदर्श हिंदवी स्वराज्य संस्थापक, महाराष्ट्र धर्म रक्षक, अशा विविध पैलूंनी नटलेले असे अष्टावधानी, कार्यकुशलतेचे, निर्णयशीलतेचे त्यांच्या कार्यातील योगदान दिसून येते.

4) सद्य:स्थितीतील भारतातील राजकीय प्रशासन व तत्कालीन शिवकालीन प्रशासन यांची तुलना केली असता पारदर्शक प्रशासन व्यवस्थेचे व आदर्श राज्याची दूरदृष्टी , प्रेरकता दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) कुलकर्णी अ. रा. (डॉ), महाराष्ट्र समाज आणि संस्कृती, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती 2008 पृ.क्र. 45

2) खोले विलास (संपा) आज्ञापत्र, लोकवाङ:मय गृह, मुंबई, पाचवी आवृत्ती, 2008 पृ. क्र. 37

3) सरदेसाई गो .स ,मराठी रियासत खंड 1- पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती 1935 पृ. क्र. 35

4) हेरवाडकर र .वी (संपा) शिवछत्रपतींचे चरित्र, सभासद बखर, प्रथम आवृत्ती 1986 पुनर्मुद्रण 20140 व्हीनस प्रकाशन, पुणे पृ. क्र. 14

5) पगडी सेतूमाधवराव, 'छत्रपती शिवाजी' नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली, नववी आवृत्ती 2013 पृ. क्र. 120

6) दातार माधव, महाराष्ट्र एका संकल्पनेचा मागोवा, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती 2012 पृ. क्र. 85

7) कुलकर्णी अ.रा. मध्ययुगीन महाराष्ट्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती 2007, पृ. क्र. 23

8) हनवते प्रेम, शिवरायांचे निष्ठावंत मुस्लिम सैनिक, अमिटी पब्लिकेशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती 1994, पृ. क्र. 52

9) पुरंदरे बाबासाहेब, राजा शिवछत्रपती, मुद्रण इरा इंटरप्राईझेस, पुणे, 17 वी आवृत्ती 2010 पृ. क्र. 90

10) सप्रे स.आ. (संपा) कामगार वैभव, 'शिवराजांसीआठवावे' विशेषांक, शासकीय मध्यवर्ती मुद्राणालय मुंबई, ऑगस्ट 1974, पृ. क्र. 175